कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज इस्लामपूर

B.A/B.Com/B.Sc/BCS/Biotech/Microb/IT/BCA Part I

Compulsory Subject

## Democracy Election & Good Goverance

(लोकशाही निवडणूक व सुशासन)

**Question Bank**

1. **अब्राहम लिंकन** यांनी लोकशाहीची 'लोकांचे, लोकांनी, लोकांसाठी चालवलेले राज्य' अशी व्याख्या केली आहे

2. लोकशाही म्हणजे **लोकांच्या** समंतीवर चालणारे शासन होय.

3. **लोकशाही** हा असा शासन प्रकार आहे, 'की ज्यात सामाजिक व आर्थिक परिवर्तन होताना शांततामय व कायदेशीर मार्गाने होते ती व्यवस्था म्हणजे लोकशाही होय' अशी व्याख्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी केले आहे.

4. साम्यवादी देशात **आर्थिक** लोकशाहीवर भर दिला जातो.

5. प्रातिनिधिक लोकशाहीचे **अध्यक्षीय व संसदीय** लोकशाही असे दोन पर्याय किंवा प्रकार आहेत.

6. लोकांनी स्वतःलाच मुक्त, समान व स्वतंत्र व्यक्ती या दृष्टीने स्वतःवर राज्य करणे असा अप्रत्यक्ष **लोकशाहीचा** अर्थ आहे.

7. लोकशाहीमधील अंतिम सार्वभौम सत्ता ही **लोकांच्या** हाती असते.

8. मुक्त आणि सार्वत्रिक निवडणुका सार्वत्रिक प्रौढ मताधिकार ही दोन वैशिष्ट्ये लोकशाहीची आहेत.

9. लोकशाही शासनव्यवस्था हि **विकेंद्रीकरण** तत्वावर आधारलेली आहे.

10 उदारमतवादी लोकशाहीमध्ये **व्यक्तीच्या** विकासावर भर दिला जातो.

11. इंग्लंडच्या राजाकडून नागरी हक्काची सनद **1215** मध्ये मंजूर झाली.

12. **फ्रेंच राज्यक्रांतीतून** स्वातंत्र्य, समता, व बंधुता ही तत्त्वे जगाला मिळाली.

13. प्रत्यक्ष लोकशाहीचा मार्ग **स्विझरलँड** या देशांमध्ये स्वीकारला आहे.

14 **लोकशाही** ही शासन प्रणालीचा असा प्रकार आहे की, 'ज्या सर्व लोक किंवा त्यांच्यापैकी त्यांनीच निवडून दिलेल्या प्रतिनिधींनी च्या मार्फत शासकीय सत्तेचा वापर करतात अशी व्याख्या जॉन स्टुअर्ट मिल यांनी केली आहे.

15. **लोकशाहीत** वैधानिक मार्गाने शासन बदलण्याचा अधिकार लोकांना असतो.

16. अमेरिका **50** घटक राज्यांचे मिळून संघराज्य बनले आहे.

17 उदारमतवादी लोकशाहीमध्ये **व्यक्तिस्वातंत्र्याला** महत्त्व दिले जाते.

18. उदारमतवादी लोकशाही व्यवस्थेत **व्यक्ती** विकासासाठी व्यक्तिस्वातंत्र्याचा आग्रह असतो.

19. भारतामध्ये **<u>संसदीय</u>** लोकशाही आहे.

20. संसदीय लोकशाहीत राष्ट्र प्रमुखाची किंवा राष्ट्रपतीची निवड **<u>अप्रत्यक्षरीत्या</u>** जनतेकडून होते.

21. संसदीय लोकशाही शासन पद्धती मध्ये व **<u>कार्यक्षमता</u>** हा दोष आढळतो.

22. अमेरिकेत **<u>अध्यक्षीय</u>** लोकशाहीचा प्रकार आहे.

23. भारतीय लोकशाहीस **<u>इंग्लंडच्या</u>** लोकशाहीने जास्त प्रभावित केले आहे.

24. लोकशाहीमध्ये अंतिम सत्ता **<u>जनतेच्या</u>** हाती असते.

25. भारतीय राज्यघटनेत वयाची **<u>18 वर्षे</u>** पूर्ण करणाऱ्या सर्व प्रौढ नागरिकास मतदानाचा अधिकार दिला आहे.

26. भारतीय राज्यघटनेने **<u>निवडणूक आयोग</u>** या घटनात्मक आयोगाकडे निवडणुकीची प्रक्रिया सोपविली आहे.

27. भारतामध्ये **<u>राष्ट्रपती</u>** हे नामधारी किंवा घटनात्मक कार्यकारी प्रमुख असतात.

28. पंतप्रधान व त्यांच्या मंत्रिमंडळाकडे राष्ट्राची **<u>वास्तव</u>** कार्यकारी सत्ता असते.

30. भारतामध्ये **<u>पंतप्रधान</u>** हे वास्तविक कार्यकारी प्रमुख असतात.

31. भारतीय संसदेचे **<u>लोकसभा</u>** हे कनिष्ठ सभागृह आहे.

32. भारतीय संसदेमध्ये **<u>राज्यसभा</u>** हे वरिष्ठ सभागृह आहे.

33. भारतीय राज्यघटनेच्या कलम 80 नुसार राज्यसभेची सदस्य संख्या जास्तीत जास्त **<u>250</u>** निश्चित केली आहे.

34. राज्यसभा हे **<u>स्थायी</u>** सभागृह आहे.

35. भारतातील घटक राज्याच्या विधिमंडळाच्या कनिष्ठ सभागृहाला **<u>विधानसभा</u>** असे म्हणतात.

36. महाराष्ट्राच्या विधान परिषदेची एकूण सदस्य संख्या **<u>78</u>** इतकी आहे.

37. बलवंतराय मेहता समितीने पंचायत राज्याची **<u>त्रिस्तरीय</u>** रचना मांडली आहे.

38. 73 व्या घटनादुरुस्तीने **<u>ग्रामीण</u>** पंचायतराजसंस्थांना घटनात्मक दर्जा दिला.

39. 74 व्या घटनादुरुस्तीने **<u>शहरी</u>** पंचायत राजसंस्थांना घटनात्मक दर्जा दिला आहे.

40. गावातील 18 वर्षावरील सर्व मतदार नागरिकांची सभा म्हणजे **<u>ग्रामसभा</u>** होय.

41. सध्या महाराष्ट्र, मध्यप्रदेश व गुजरात या घटक राज्याने पंचायत राजसंस्थातील महिलांच्या आरक्षण **<u>50</u>** टक्के केले आहे.

42. नगरपालिका किंवा महानगरपालिकामध्ये निर्माण केलेल्या मतदारसंघांना **<u>प्रभाग किंवा वार्ड</u>** असे म्हणतात.

43. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या वेगवेगळ्या अंगाशी संबंधित कायदे करण्याचा अधिकार <u>घटक राज्याच्या</u> कायदेमंडळाला दिला आहे.

44. भारतीय घटनेनुसार विधानसभेची जास्तीत जास्त सदस्य संख्या **<u>500</u>** इतकी ठरविण्यात आली आहे.

45. सध्या महाराष्ट्र, कर्नाटक, उत्तर प्रदेश, बिहार व जम्मू काश्मीर या पाच घटक राज्यात विधिमंडळाचे

**विधानपरिषद** हे द्वितीय सभागृह अस्तित्वात आहे.

46. राज्यसभा सदस्यांचा कार्यकाल **सहा** वर्ष आहे.

47. **61 व्या** घटनादुरुस्तीने मतदारांचे वय 21 वरून 18 वर्षे केलेले आहे.

48. भारताचे **उपराष्ट्रपती** हे राज्यसभेचे पदसिद्ध अध्यक्ष असतात.

49. भारताने **संसदीय** लोकशाहीशासन पद्धतीचा स्वीकार केला आहे.

50. 'भारत हे अर्ध संघराज्य आहे' असे **के.सी.व्हीअर** यांनी म्हटले आहे.

51. लोकशाहीतील राज्यकारभार **जनतेने** निवडून दिलेल्या प्रतिनिधी मार्फत चालवला जातो

52. जागतिक बँकेने 1989 साली सब सहार-न आफ्रिकेतील चिरस्थायी विकासाच्या अहवालांमध्ये **सुशासन** या संकल्पनेचा उल्लेख केला आहे.

53. 1992 च्या प्रकाशित झालेल्या जागतिक बँकेच्या शासन आणि विकास अहवालानुसार **सुशासनाचे** तीन निकष स्पष्ट होतात.

54. 'सुशासन संदर्भात आम्हास सामर्थ्यवान शासन संस्थेची गरज नाही, आम्हाला चांगल्या शासन संस्थेची गरज आहे' असे **डेव्हिड बॉर्न** यांनी म्हटले आहे.

55. **माहितीचा अधिकार कायदा** केंद्र सरकारने 12 ऑक्टोबर 2005 रोजी मंजूर केला आहे.

56. केंद्रीय अन्नसुरक्षा कायद्याची अंमलबजावणी **2013** साली घटक राज्य पातळीवर करण्यात आली.

57. एक खिडकी योजनेचा अंमल **महाराष्ट्र** या राज्यात सुरु करण्यात आला.

58. उत्तरदायित्व, जबाबदारी आणि पारदर्शीपणा हे तीन महत्त्वाची वैशिष्ट्ये **सुशासन** या संकल्पनेत आढळतात.

59.सुशासनाच्या व्यापक अंमलबजावणीसाठी **लोकशाही विकेंद्रीकरण** ही बाब महत्त्वाची ठरते.

60. केंद्रीय माहिती अधिकार 2005 मध्ये कलम 15 नुसार प्रत्येक घटक राज्यात **राज्य माहिती आयोग** स्थापन करण्याची तरतूद करण्यात आली आहे.

61. केंद्र सरकारने 1998 साली **सैनिकी प्रशासन** या घटकासाठी ई.गव्हर्नन्सची मोहीम सुरू केली-

62. शासन ज्ञान केंद्र (GKC) या वेब पोर्टल ची स्थापना **2005** साली झाली.

63. राष्ट्रीय अन्नसुरक्षा कायदा 2013 नुसार प्रत्येक व्यक्तीस **पाच किलो** धान्य देण्याची सोय करण्यात आली आहे.

64. लोकशाही विकेंद्रीकरणाला प्रोत्साहन देण्यासाठी **73 वी घटना दुरुस्ती** विधेयक 1992 साली मंजूर करण्यात आले.

65. भारतात सुशासनाची सुरुवात **नवव्या पंचवार्षिक** योजनेनुसार झाली आहे.

66. देशातील **2/3 टक्के** जनतेला अन्न सुरक्षा कायद्याचा लाभ मिळणार आहे.

67. सुशासनाच्या संकल्पनेत **नागरिक** हा घटक मध्यवर्ती असतो.

68. माहिती अधिकार कायद्याअंतर्गत सरकारी कर्मचाऱ्यांनी **30 दिवसाच्या** आत सरकारी दस्तऐवजाची माहिती सामान्य नागरिकास देणे आवश्यक असते.

69. सुशासन ही संकल्पना स्पष्ट करताना 'लोकांचे जीवन शांततापूर्ण, शिस्तबद्ध, प्रगतशील व सहभाग

दर्शवणारे आहे' ही व्याख्या **<u>पाणंदीकर</u>** यांनी केली आहे.

70. **<u>सुशासनात</u>** न्याय व कृतिशील अशी कायद्याची चौकट असणे गरजेचे असते.

71. भारत सरकारने 18 मे 2006 रोजी राष्ट्रीय **<u>ई-शासन</u>** योजना मंजूर केली आहे.

72. सुशासनास **<u>स्मार्ट</u>** प्रशासन असे संबोधले जाते.

73. राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान 12 एप्रिल 2005 अंतर्गत **<u>प्राथमिक आरोग्य सुविधा</u>** ही सेवा उपलब्ध करून देण्याचा उद्देश होता.

74. राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना कायदा **<u>2005</u>** मध्ये केंद्र सरकारने मंजूर केला.

75. सुशासन म्हणजे **<u>ईशासन किंवा ई- गव्हर्नन्स-</u>** होय.

राज्यशास्त्र विभाग
कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज इस्लामपूर